# कोरोना महामारी व समाज



- संपादक -
प्रा.देवराये एस.एम.
डॉ.वाकणकर जी.बी.
डॉ.टेंगसे एस.ए.

NOTION PRESS
India. Singapore. Malaysia.

Published by Notion Press 2021
Copyright © Devraye S. M., Wakankar G.B., Tengse S. A. 2021
All Rights Reserved.
ISBN 9781685540197
This book has been published with all reasonable efforts taken to make the material error-free after the consent of the author. No part of this book shall be used, reproduced in any manner whatsoever without written permission from the author, except in the case of brief quotations embodied in critical articles and reviews.
The Author of this book is solely responsible and liable for its content including but not limited to the views, representations, descriptions, statements, information, opinions and references ["Content"]. The Content of this book shall not constitute or be construed or deemed to reflect the opinion or expression of the Publisher or Editor. Neither the Publisher nor Editor endorse or approve the Content of this book or guarantee the reliability, accuracy or completeness of the Content published herein and do not make any representations or warranties of any kind, express or implied, including but not limited to the implied warranties of merchantability, fitness for a particular purpose. The Publisher and Editor shall not be liable whatsoever for any errors, omissions, whether such errors or omissions result from negligence, accident, or any other cause or claims for loss or damages of any kind, including without limitation, indirect or consequential loss or damage arising out of use, inability to use, or about the reliability, accuracy or sufficiency of the information contained in this book.

# अनुक्रमनिका

1. कोरोना महामारी व मराठी भाषा
सखाराम बाबाराव कदम..... 1

2. कोरोनाचा क्रीडा क्षेत्रावरील परिणाम
डॉ पवन प्रकाशराव.पाटील..... 7

3. कोरोनाचा भारतीय समाजव्यवस्थेवरील परिणाम
प्रा. कविता मोराडे..... 11

4. कोरोनाचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम.
डॉ विठ्ठल रामकिशन भोसले..... 15

5. कोविड 19 एक महामारी.
प्रा डॉ.अशोक डी चव्हाण..... 26

6. कोरोनाचा भारतीय समाजव्यवस्थेवरील परिणाम
टेंगसे सुनिता आत्माराव, गांगर्डे गोपाळ मदन .... 35

7. कोरोना आणि भारतीय अर्थव्यवस्था
प्रा. डॉ. अंभुरे एस.डी..... 43

8. कोविड -19 चा भारताच्या कृषी क्षेत्र वरील परिणाम विश्लेषणात्मक अभ्यास
डॉ. बी. आर. शिंदे.... 49

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

येणाऱ्या-जाणाऱ्या श्वासाकडे तटस्थपणे पाहात राहाणे एवढे जरी केले तरी पुष्कळ आहे.

आपण माणूस आहोत. माणसाने वेळोवेळी अनेक संकटाशी मुकाबला करीत स्वतःचे अस्तित्व इथंपर्यंत आणलेले आहे. आताही आपण एकोप्याने, एकदिलाने वागून एकमेकाला मदत करीत जगूया. माणसासी माणसाप्रमाणे जगणे आणि निसर्गाची होणारी लूट थांबवणे, एवढे जरी झाले तरी कोरोनाने शिकवलेला तो एक धडा आहे असे म्हणावे लागेल.

**संदर्भ**

1 कोविड 19 जागतिक आरोगया संघटना अहवाल **2019**

2 कोविड शी मुकाबला - संग्राम पाटील

3 **www** कोविड19 .कॉम

4 कोविड 19 - एक महामारी - डॉ शिवनाथ शर्मा





# कोरोनाचा भारतीय समाजव्यवस्थेवरील परिणाम

**प्रा. टेंगसे सुनिता आत्माराव.**[1] **प्रा. गांगर्डे गोपाळ मदन.**[2]

[1]कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी

[2]विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद

*****

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

**प्रस्तावना :**

कोरोनाने जगामध्ये भय आणि क्लेशदायक परिस्थिती निर्माण केली आहे.सबंध मानवी जीवनामध्ये एक प्रकारची गतिशून्यता आणली आहे.भारतही आज या आजाराशी मुकाबला करताना संघर्षमय परिस्थितीतून जातो आहे.आज भारतात करोनाग्रस्तांची संख्या लाखांत आहे.करोनाशी मुकाबला करण्यासाठी सरकार सर्व उपाययोजना करत आहे.लॉकडाउनही थोडे शिथिल करण्यात आले आहे.अशा संकटसमयी सार्वजनिक क्षेत्रामधील सामान्य जनतेच्या परहितकारक वृत्तीचीही कसोटी लागली आहे.कोरानाग्रस्त रूग्णांकडे दया भावनेने पाहणे अपेक्षित होते; पण त्या ऐवजी समाजात तिटकारा अधिक प्रकर्षाने जाणवतो.कोराना रूग्णांकडे लोक ज्या तिटकाऱ्याने पाहतात; त्यामुळे भारतीय समाजाचे सार्वजनिक क्षेत्र विवेकशून्य बनत चालले आहे.कोरानामुळे व्यक्ती-व्यक्तींमधील नातेसंबंधाविषयी एक विवक्षित अन्वयार्थ लावण्याची संधी वैचारिक चर्चा विश्वाला दिली आहे.

कोरोनाची लागण झालेल्यांची संख्या एका बाजूला वाढत असताना, दुसऱ्या बाजूला त्यांच्या प्रती त्यांचेच शेजारी व नातेवाइक असंवेदनशील होताना दिसतात. कारोना लागण झालेल्या व्यक्तीकडे कुत्सित दृष्टीने पाहिले जात आहेच; पण अनेक ठिकाणी त्या व्यक्तीला अक्षरश: वाळीत टाकण्याच्याही घटना घडत आहेत. मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. समाजामध्ये राहूनच त्याला मनुष्यत्व प्राप्त होते, हे प्राचीन ग्रीक विचारवंत ॲरिस्टॉटल याने सांगितले. त्याने मनुष्याचा विवेक व परहितकारक वृत्ती आपल्यापुढे ठेवून मूल्यक्ष्यी विवेचन केले होते; परंतु कोरोनामुळे मनुष्याची वाटचाल एकमयतेतून तुटकपणाकडे होत आहे, माणूसपणाचा अध:पात होताना दिसतो आहे. मनुष्य अधिक आत्ममग्न झाला आहे, म्हणूनच कोरानाच्या निमित्ताने सार्वजनिक विवेकाचा भारतीय समाजव्यवस्थेत सत्वभ्रंश झाल्यासारखी परिस्थिती ओढावली आहे.

**कोरोना आणि भारतीय समाजव्यवस्था :**

प्रस्तुत लेख हा सार्वत्रिक नागरी वर्तनाच्या चर्चाविश्वात उदगम पावलेल्या, मानवी व्यवहाराच्या कक्षेतील ज्या 'अपकर्षण' व्यवहाराचा उगम झाला आहे, त्याची समीक्षा करणारा आहे. हा 'अपकर्षण व्यवहाराचा' कोरोना सेवा देणारे कर्मचारी यांच्याप्रती द्रवेषपूर्ण व्यवहार व त्यांना वाळीत टाकण्याची वृत्ती, असा सध्या आपल्या सार्वजनिक क्षेत्रात दिसून येते. ही क्लेशदायक बाब आहे; त्यामुळे भारतातील मूल्यात्मक सार्वजनिक विवेकच धोक्यात आला आहे.





सार्वत्रिक विवेकाचे आदर्श तत्व, भौतिक जगात व्यक्ती व्यक्तींमधील नैतिक व्यवहार, नागरी मूल्य, सार्वत्रिक हित यांची चिकित्सा करणारी ही एक मोजपटटी आहे, असे मानले जाते. कोणताही समाज त्या त्या सामाजिक व्यवस्थेची काही मूलभूत श्रदधा, मुल्ये इतिहासाच्या प्रत्येक टप्पयावर विकसित करत असतो. विविध सामाजिक स्तर ही श्रदधा, मूल्ये व्यापक पातळीवर आपल्याला सोयीची जाईल अशा पदधतीने उभी करून, त्या दृष्टीने विवेकशील समाजभान जनमानसात स्वयंसिदध करण्यास मदत करतात. आज मानवी व्यवहारांतील 'न्याय तत्वांच्या' निष्ठेबददल संशयग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे.

भारतीय समाजव्यवस्था सांस्कृतिकदृष्ट्रया एकजिनसी नाही.अनेक धार्मिक, वांशिक व भाषिक गटांचे अस्तित्व येथे आहे.त्याचबरोबर, आर्थिक क्षमतेच्या निकषावरही मोठ्या प्रमाणात विषमता सापडते. अशा बहुलवादी समाजरचना असलेल्या देशात जेव्हा मोठ्या प्रमाणात कोरोनाची लागण होते, तेव्हा त्या समाजाचे टीकात्मक परीक्षण 'सार्वजनिक विवेकाच्या' माध्यमातुन होणे आवश्यक बनते. सार्वजनिक विवेकाचे तत्व 'सार्वत्रिक विवेकाच्या' माध्यमातुन होणे आवश्यक बनते.सार्वजनिक विवेकाचे तत्व सार्वत्रिक श्रदधा, मूल्ये व नैतिक जीवनदृष्टीबरोबर, इतरांच्या नागरी हक्कांप्रती आदर भावना व्यक्त करत असते.प्रस्थापित व्यवस्थेतील अपूर्णता सांगताना फक्त दोष दिग्दर्शनन करता, नागरी आयुष्यात बंधुभाव कसा उतरेल, यावर भर देत असते.

कोरोनाच्या कठीण प्रसंगात एकमेकांविषयी संशय व अनादराची भावना समान जीवनात प्रकर्षाने दिसल्यामुळे 'सार्वजनिक विवेकाचा' लवलेशाही शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये दिसला नाही. कठीण काळामध्ये मनुष्य एकमेकांना कशा पदधतीने मदत करतो, या गुणाच्या आधारावर त्या समाजाच्या परहितलक्ष्यी व्यवहाराबरोबर, मनुष्यकेंद्री क्षमाशील दयाबुदधी विकास पावते; कारण ती स्वहितलक्ष्यी नाही, तर परहितलक्ष्यी करुणा असते. अशा वैशिष्ट्यांमुळे सार्वजनिक हित हे समूहलक्ष्यी बनते.समुहलक्ष्यी असल्यामुळे ती करूणामय असते. आत्मनिष्ठ दुबळ्या मनाचा स्वार्थी भाव त्यात नसतो. सार्वजनिक विवेकाचे यशापयश त्या त्या समाजातील नागरिकांच्या परहितकेंद्री स्वभावातून प्रदर्शित होत असते. कठीण प्रसंगात असलेल्या समाजबांधवांना सर्व प्रकारचे मदतकार्य करणे, हा विवेकाचा भाग आहे.

आरोग्य, पोलिस व स्थानिक प्रशासनाचे कर्मचारी दिवस-रात्र कोरोनाशी झुंज देत, रूग्णांना बरे करण्यासाठी मेहनत घेत आहेत. गेल्या काही महिन्यांपासुन मात्र या संदर्भात् एका पोलिस कर्मचाऱ्याची कहाणी खुप बोलकी आहे. धारावीमध्ये काम करणाऱ्या व कल्याणमध्ये राहणाऱ्या पोलिस कर्मचा-याला, त्याच्याच घरामध्ये काही दिवसांपूर्वी सोसायटीमधील पदाधिकारी व रहिवाशांनी प्रवेश नाकारला. त्यांच्या मोटारीचीदेखील मोडतोड केली.





नाशिक स्थित एका डॉक्टरला लक्षणेविरहित कोरोना झाल्यावर, वैद्यकीय सल्ल्याप्रमाणे त्यांना रूग्णालयापेक्षा घरीच विलगीकरणाचा सल्ला देण्यात आला. सोसोयटीमध्ये आल्यावर, त्यांना इतर रहिवाशांनी त्यांच्यात सदनिकेत प्रवेशाला मज्जव केला. परिणामी डॉक्टरांना आपल्या रूग्णालयातील स्टोअररूममध्ये राहावे लागले. त्यांच्या अमेरिकेतील मुलाला शेवटी पोलिसांत तक्रार दाखल करावी लागली. ही कृती सामाजिक बहिष्कार दर्शविते. कोरोनाबाधित रूग्णांवरील सामाजिक बहिष्कारासारख्या वाढत्या घटनांमुळे, पोलिसांना अनेक हाउसिंग सोसायटयांना कायदेशील नोटिसा पाठवाव्या लागल्या आहेत. एका बाजुला सार्वजनिक विवेकच्या ऱ्हासाने भारतीय समाजात परात्मता आणि तुटकपणा आला असताना, दुसऱ्या बाजूला आरोग्य समस्येचे निराकरण करण्यासाठी, कायदा व सुव्यवस्थेच्या उपाययोजना करण्यावर राज्यसंस्थेने भर दिला आहे. लॉकडाऊनची अंमलबजावणी करण्यासाठी पोलिस यंत्रणा कार्यरत आहे, म्हणजे आज कोरोना ही आरोग्य विषयक समस्या नसून, ती एक कायदा सुव्यवस्थेचा भाग असल्याची परिस्थिती सामाजिक अंतर किंवा 'फिजिकल डिस्टन्सिंग' ची संस्कृती शारीरिक अंतराऐवजी जाती जातीमध्ये व वर्गावर्गामध्ये कायमचे 'सोशल डिस्टन्सिंग' रूजवेल, अशी भीती अभ्यासक व्यक्त करत आहेत. ही भीती खरी व्हायची नसेल, तर कोरोना आपल्या नात्यांवर आणि सामाजिक संबंधांवर स्वार होता कामा नये.

**पद्धतीशास्त्र :**

संशोधन हा इंग्रजी भाषेतील या इंग्रजी शब्दाचा मराठी भाषेतील पर्यायी शब्द आहे. संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेतील नवीन तथ्य अथवा तत्वे शोधण्यासाठी आणि जुनी तत्वे यांचे परीक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पध्दतीशीर अभ्यास होय. प्रत्येक संशोधन विषयात ज्या संकल्पना, सिध्दांत, निष्कर्ष स्वीकृत झालेले आहेत त्यांचे प्रामाण्य पुन्हा पुन्हा तपासून पाहणे हे अभ्यासकाचे काम असते. जे सिध्दांत विभिन्न शास्त्रात प्रस्थापित झालेले आहेत त्यांची विश्वासार्हता तपासुन पाहण्याची तसेच नवीन तथ्याचा आधारे सिध्दांतात बदल करण्याची देखील आवश्यकता पडते.

संशोधन करण्यासाठी कोणतील पध्दती वापराची हे संशोधन विषयावर अवलंबून असते. संशोधन विषयाप्रमाणे संशोधनाची पध्दत बदलत असते. ज्या विषयात किंवा विषयाच्या अनुषंगाने फारसे संशोधन झालेले नाही, अशा विषयाच्या अभ्यासासाठी प्रश्नावली, मुलाखत अशा शास्त्रीय संशोधन तंत्राचा उपयोग करावा लागतो.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

सामाजिक संशोधनामध्ये उद्दिष्टांना अतिशय महत्व असते. उद्दिष्ट निश्चित करून संशोधनातील कार्य पूर्ण केले जाते. कुठलेही सामाजिक संशोधन हे निश्चित अशा उद्दिष्टांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. योग्य उद्दिष्टांची नोंद केली असता





संशोधनासाठीची दिशा स्पष्ट होते. प्रसतुत संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

1) कोरोनाचे स्वरूपाचा आणि व्याप्ती याचा आढावा घेणे.
2) प्रसार माध्य कोरोनाचे स्वरूपाचा आणि व्याप्ती आढावा घेणे.
3) शासन-जनता आणि जनता-शासन यांचा परस्पर संबंध अभ्यासणे.
4) कोरोनाचे समाज जीवनातील स्थान निश्चिती करणे.

**संशोधनाची गृहितके :**

1) कोरोनामुळे समाजजीवन असताव्यस्त झाला.
2) कोरोणामुळे सामाजिक आंतरक्रिया कमी झाली.
3) कोरोनामुळे अफवा-वाढत आहेत.
4) कोरोनामुळे सामाजिक प्रसार माध्यमांचा दुरूपयोग आणि नियंत्रण वाढत जात आहे.

**संशोधनाची निष्कर्ष :**

1) कोरोनामुळे सामाजिक आंतरक्रिया वाढत गेल्या, सामाजिक जीवन विस्कळीत झाले.
2) कोरोनामुळे स्त्रीगुन्हेगारी वाढली. तसे कौटुंबिक विघटन पण वाढत गेले.
3) माणसाच्या आदिम प्रवृत्तीपासून गुन्हेगारी आढळून येते. गुन्हेगारीची पदधती, मोड सतत बदलत गेला परंतु माणसाची गुन्हेगारीची मूळ प्रवृती मात्र आहे तशीच आहे.

4) लोंकामध्ये एकमेकाविषयी संशयाची भावना वाढीस लागली. प्रचंड घाबरलेले दिसून आले.

संदर्भ सूची :

1) कसबे रावसाहेब 1994, हिंदु-मुस्लिम प्रश्न आणि सावकारांचा हिंदु राष्ट्रवाद, सुगावा प्रकाशन, पुणे.
2) चौसाळकर, अशोक 2014, आधुनिक भारतीय राजकीय विचार, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
3) जावडेकर, श. द. 1941, गांधीवाद, विवेचन माला, पुणे.
4) देसाई, दत्ता 2019, नवउदार जगाचा उदयास्त, युनिक पुणे.
5) पवार, प्रकाश 2020, कोव्हिड -19 कथा नव्या युगाची नांदी, मराठी, कोल्हापूर.
6) दैनिक लोकसत्ता.
7) दैनिक महाराष्ट्र टाईम्स.
8) विकीपिडीया.
9) डॉ. संग्राम पाटील, यु- टयुब चॅनल.
10) सामाजिक प्रसारमाध्यमे.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani





# कोरोना आणि भारतीय अर्थव्यवस्था

प्रा.डॉ. अंभुरे एस.डी.
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ.

*****

**प्रस्तावना:**

कोरोनाची सुरूवात चीन मध्ये वुहान शहरातुन झाली. दि.01 डिसेंबर 2019 रोजी चीन मध्ये पहिला रूग्ण वुहान शहरात सापडला. या रोगाला प्रथम "कोरोना" हे नाव देण्यात आले. त्या नंतर जागतिक आरोग्य संघटना WHO ने कोरोनाला CPVID-19 व SARC-COVL असे नाव देण्यात आले. जागतिक आरोग्य संघटने 31 जानेवारी 2020 रोजी महामारी घोषीत केली. भारतात 30 जानेवारी 2020 ला केरळ मध्ये त्रिशूर येथे पहिला रूग्ण सापडला. महाराष्ट्रात दि.10 मार्च 2020 रोजी पुण्यात कोरोना रूग्ण सापडला. आणि दि.23 मार्च 2020 पासून महाराष्ट्रात अनेक जिल्हात संचारबंदी लागु केली. शाळा, महाविद्यालय, कार्यालये, बससेवा, रेल्वे सेवा, दुकाने, बाजारे, कारखाने, उदयोगधंदे, व्यापार वाहतूक बंद झाली. यामुळे लाखो लोक रात्रदिवस प्रवास करून गावी परत आले.

संपुर्ण जगात आणि भारतात, महाराष्ट्रात कोरोना रूग्ण झपाटयाने वाढत होते. संपुर्ण देशात फार मोठी कोरोणाची दहशत निर्माण झाली होती. अशा काळात भारतात प्रत्येक राज्यानी